Vol 4 Issue 9 March 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# स्वातंत्र्योत्तर भारताच्या कृषी विकासात 'भारत कृषक समाजाचे योगदान'

*कल्पना राजीव मोहिते.*

M.A. M.Phil. Ph.D.P.G.D.C.
यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय , इस्लामपूर.

**सारांश :-** कृषिक्रांती ही जगातील आद्य संस्कृती आहे. भारतीय अर्थ व्यवस्था ही प्रामुख्याने कृषी वरच अवलंबून आहे. भारतातील कृषी व्यवसाय अनेक वर्षापासून परंपरागत पध्दतीने केला जात आहे. 20 व्या शतकात जागतिक दृष्टीने कृषी विज्ञानात बरीच प्रगती झाली. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावरच भर देण्यात आला.

सुधारित बी–बियाणे, सुधारित खते, सुधारित अवजारे, दुबार पीक पध्दती आणि जलसिंचनाच्या बहुविध आणि अत्याधुनिक पध्दती यातील मुलभूत परिवर्तने भारतातील शेती पध्दतीत व्हावी या उद्देशाने शासनामार्फत प्रयत्न केले गेले. कारण शेतकरी हाच देशाच्या ख–या संपत्तीचा निर्माता व राष्ट्रीय हिताचा वारस परंतु शेतक–यांची तत्कालीन अवस्था मात्र दयनीय होती. तेव्हा या अवस्थेतून शेतक–याला बाहेर काढण्यासाठी त्याला प्रथम संघटीत करणे गरजेचे होते. शेतक–यांची संख्या जास्त असुनही हा वर्ग असंघटीत होता. त्यामुळे तो अनेक दु:खाना सामोरे जात होता. अशा लाखो खेडयात पसरलेल्या भारतातील षेतक–यांना जागृत व संघटीत करण्यासाठी त्यांची प्रगती साधण्यासाठी तत्कालीन कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणेतून आखिल भारतीय स्वरूपाच्या अषा ' भारत कृषक समाज ' या संघटनेची 1955 साली स्थापना केली गेली. कारण त्यांच्यामते 'अन्यायाला सामोरे जाण्याची ताकद संघटनेशिवाय निर्माण होत नाही ' हा त्यांचा विचार त्यांनी शेतक–यांसाठी ही संघटना स्थापन करून पूर्ण केला. या समाजाव्दारे आमच्या भारतातील खेडयातील शेतकरी विज्ञाननिष्ठ बनला. भारतातील संघटीत झालेल्या शेतक–यांना कृषी विषयक समस्यांना तोंड देण्याकरिता आखिल भारतीय स्वरूपाचे हे व्यासपीठ उपलब्ध होऊन त्या मार्फत परदेशी जाण्याची संधी देऊन भारतीय कृषीविषयक समस्यांचा अभ्यास करण्यास प्रवृत्त केले.

स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिल्या दशकात स्थापन झालेला हा समाज म्हणजे शेतक–यांच्या जीवनाला नवसंजीवनी देणारी घटना होय. ही संस्था देशव्यापी असून आजही तिचे कार्य चालूच आहे. या समाजाने भारतातील शेतकरी आंदोलनाला नवी दिशा, आशा, भाषा दिली. भारतीय शेतकरी म्हणजे सर्वात मोठा अन्नदाता आणि राष्ट्राचा पोशिंदा व त्याचे दारिद्रय आणि अज्ञान दूर करणे म्हणजे भारताला वैभवाला नेणे. शेतक–यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाचा ध्यास ठेवूनच या समाजाने कार्य केले. प्रगतीची व वैभवाची दिशा समाजाने भारतातील सर्व जाती, धर्म, पंथ व भाषेच्या शेतक–यांना देण्याचे कार्य केले. नवविज्ञानाच्या मार्गाने आपला व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे देशात नवीन विचार नवीन जागृती निर्माण झाली.

आज भारता सारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या लाखो खेडयातील शेतकरी संघटित होऊन जागृत झाला आहे व या संघटनेची देशव्यापी आंदोलने दरवर्षी होऊ लागली आहेत. संघटनेमार्फत शेतकरी संघटीत होऊन एकमुखाने बोलू लागला आहे. हे भारत कृषक समाजाचे मौलिक असेच कार्य आहे. कृषी विकासाला फार मोठी चालना देण्याचे काम या समाजाने केले आहे. म्हणून शेतक–यांच्या कृषी विकासाला प्रेरक असणा–या 'भारत कृषक समाज' या संघटनेच्या कार्याचा आढावा या शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## प्रस्तावना

कृषिक्रांती ही जगातील आद्य संस्कृती आहे. भारतीय अर्थ व्यवस्था ही प्रामुख्याने कृषी वरच अवलंबून आहे. भारतातील कृषी

व्यवसाय अनेक वर्षापासून परंपरागत पध्दतीने केला जात आहे. 20 व्या शतकात जागतिक दृष्टीने कृषी विज्ञानात बरीच प्रगती झाली. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावरच भर देण्यात आला.

सुधारित बी–बियाणे, सुधारित खते, सुधारित अवजारे, दुबार पीक पध्दती आणि जलसिंचनाच्या बहुविध आणि अत्याधुनिक पध्दती यातील मुलभूत परिवर्तने भारतातील शेती पध्दतीत व्हावी या उद्देशाने शासनामार्फत प्रयत्न केले गेले. कारण शेतकरी हाच देशाच्या ख–या संपत्तीचा निर्माता व राष्ट्रीय हिताचा वारस परंतु शेतक–यांची तत्कालीन अवस्था मात्र दयनीय होती. तेव्हा या अवस्थेतून शेतक–याला बाहेर काढण्यासाठी त्याला प्रथम संघटीत करणे गरजेचे होते. शेतक–यांची संख्या जास्त असुनही हा वर्ग असंघटीत होता. 1 त्यामुळे तो अनेक दु:खाना सामोरे जात होता. अशा लाखो खेडयात पसरलेल्या भारतातील शेतक–यांना जागृत व संघटीत करण्यासाठी त्यांची प्रगती साधण्यासाठी तत्कालीन कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रेरणेतून आखिल भारतीय स्वरूपाच्या अशा ' भारत कृषक समाज ' या संघटनेची 1955 साली स्थापना केली गेली. कारण त्यांच्यामते 'अन्यायाला सामोरे जाण्याची ताकद संघटनेशिवाय निर्माण होत नाही ' हा त्यांचा विचार त्यांनी शेतक–यांसाठी ही संघटना स्थापन करून पूर्ण केला. या समाजाव्दारे आमच्या भारतातील खेडयातील शेतकरी विज्ञाननिष्ठ बनला.2 भारतातील संघटीत झालेल्या शेतक–यांना कृषी विषयक समस्यांना तोंड देण्याकरिता आखिल भारतीय स्वरूपाचे हे व्यासपीठ उपलब्ध होऊन त्या मार्फत परदेशी जाण्याची संधी देऊन भारतीय कृषीविषयक समस्यांचा अभ्यास करण्यास प्रवृत्त केले. म्हणून शेतक–यांच्या कृषी विकासाला प्रेरक असणा–या हवे तशा भारत कृषक समाज या संघटनेच्या कार्याचा आढावा या शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### *भारत कृषक समाजाची स्थापना –*

कृषी व अन्न हे भारताचे मुलभूत प्रश्न आहेत. या जाणीवेतून कृषकांच्या हिताच्या अनेक योजनां कृषिमंत्री या नात्याने डॉ. पंजाबराव देशमुख मांडत. 15 व 16 जुलै 1954 रोजी श्रीनगर येथे भारतातील सर्व राज्यांचे कृषी खात्याचे मंत्री, कृषीतज्ञ व शेतक–यांचे प्रतिनिधी यांच्या भरलेल्या प्रचंड मेळाव्यापुढे भारतीय कृषक समाजाची कल्पना सर्वासमोर डॉ. पंजाबरावानी मांडली. या योजनेला उपस्थितीतांनी एकमुखाने परवानगी देऊन हा समाज आस्तित्वात आला व त्याचे अध्यक्ष म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांची एकमुखाने निवड करण्यात आली. अशा रितीने भारत कृषक समाज ही आखिल भारतीय स्वरूपाची शासकीय संस्था स्थापन होऊन तिची घटनाही तयार होऊन 7 फेब्रुवारी 1955 रोजी रजिस्टर झाल्यानंतर पहिले अधिवेशन दिल्ली येथे घेण्यात आले.3

15 फेब्रुवारी 1955 रोजी या समाजाच्या संबंधी आपले विचार रेडिओवरील भाषणात व्यक्त करताना डॉ. पंजाबराव म्हणतात, '' भारताला अशा एका संस्थेची आवश्यकता आहे की जी राष्ट्रीय स्तरावर शेतक–यांचे विचार व दृष्टीकोन यांचा विचार करेल.'' ही गोष्ट कांही अंशी शक्य होईल. भविष्यात आखिल भारत कृषक समाजाच्या शाखा, राज्य, जिल्हे, आणि तालुक्यांच्या ठिकाणी निर्माण होतील. या समाजाच्या माध्यमातून सर्व शेतक–यांना एकत्रित येऊन समस्यांचे निराकरण करण्याची संधी मिळेल. सर्व लोकांनी या समाजाचे स्वागत केले. कारण याच्या स्थापनेमागील उद्देश पाहता विदेशातील शेतकरी विज्ञानवादी बनला असता भारतातील शेतक–याने सुध्दा त्यादृष्टीने जगावे हाच याच्या स्थापनेमागे महत्वाचा दृष्टीकोन होता हे त्याची घटना पाहिल्यावर लक्षात येते.

### *भारत कृषक समाजाची घटना– उद्दिष्टये –*

1) शेतक–यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक प्रश्नांचा अभ्यास करणे.
2) सरकार व इतर संस्थांच्या सहकार्याने शेतक–यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे शिक्षण देणे तसेच कृषी विषयक उपयोगी अशा नवनवीन प्रयोगांची माहिती करून देणे.
3) सर्व शेतक–यांच्या कल्याणार्थ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषिविषयक धोरण आखणे.
4) कृषिविषयक प्रदर्शने, चर्चासत्रे, मेळावे, संमेलने आयोजित करणे.
5) भारतातील विविध राज्यातील तसेच परदेशातील शेतक–यांना परस्पर भेटीगाठीची सुसंधी प्राप्त करून देऊन त्यांच्यात परस्पराबद्दल सुहय भाव व समजूतदारपणा निर्माण करणे.
6) भारतातील कृषी उत्पादकांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
7) वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी योग्यवेळी योग्य पाऊल उचलून कार्यासाठी निधी संग्रह, प्रचार, प्रकाशन, सभा, संमेलने प्रदर्शने भरविणे.

थोडक्यात कृषकांच्या सर्वांगीण हिताचा विचार या संघटनेच्या उद्दिष्टामध्ये पहावयास मिळतो. व तो पूर्ण करण्यात समाजाचे प्रत्येक पाऊल पुढे पडलेले दिसते.

### *भारत कृषक संघटनेचे स्वरूप*

भारतात सर्व व्यवसायाच्या संघटना असता, शेतक–यांच्या संघटनेचा अभाव लक्षात घेता शेतक–यांच्या हितासाठी स्थापन झालेली ही अराजकीय व जातपात विरहित अशी संघटना आहे. व या संघटनेव्दारे भारतातील शेतकरी आपल्या दैनंदिन

शेतीविषयक गरजांचा पाठपुरावा करू शकतो. त्याचबरोबर ही संघटना देशस्तरावर कृषी मेळावे, संमेलने भरवून देशातील शेतक-यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांचा विचार करून सरकारला अशा समस्यांबद्दल जागृत ठेवू शकते.

या समाजातर्फे भारतातील व परदेशातील शेतक-यांचे आदान प्रदान दौरे वेळोवेळी आयोजित करण्यात येतात. त्याचबरोबर ' भारत कृषक समाज पत्रिका ' प्रांत व देश स्तरावरून प्रसिध्द करण्यात येते व त्याव्दारे शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यास मदत होते. समाजाच्या घटनेनुसार देशातील शेतक-यांनी देशस्तरावर व अन्य अशा स्तरावर सामाजिक कार्य करण्याची संधी या समाजाने प्राप्त करून दिली आहे. याचे संपूर्ण श्रेय संस्थापक डॉ. पंजाबराव देशमुखांना जाते ते या संस्थेचे आजीवन अध्यक्ष होते. परंतु पुढील काळासाठी त्यांनी कंद्रीय कृषीमंत्री यांनाच या संस्थेच्या अध्यक्षपदी ठेवण्याची तरतूद केलेली आहे.

### *भारत कृषक समाजाची कार्यालयीन ठिकाणे –*

या समाजाचे मुख्य कार्यालय राजधानी दिल्ली येथे आहे. तत्कालीन कागदपत्रावरून इतर कृषीविषयक 8 कार्यालये आहेत. व दिल्लीला समाजाच्या 3 भव्य इमारती असून प्रत्येक प्रांताच्या ठिकाणी शाखा आहेत. व ठिकठिकाणी कार्यालयीन इमारतीही आहेत. दिल्लीला या समाजाचे 'डॉ. पंजाबराव कृषीभवन' या नावाचे कार्यालय आहे. ही इमारत निजामुद्दीन मार्गावर आहे. भारताच्या कोणत्याही भागातून येणा-या शेतकरी कार्यकर्त्यांची तेथे राहण्याची सोय केलेली आहे. या समाजाची तत्कालीन परिस्थितीत पाऊण कोटी रूपये किंमतीची दुसरी इमारत कॅनॉट प्लेस दिल्ली येथे आहे. त्याचबरोबर दिल्लीजवळ 12 मैलावर 300 एकर जागा घेऊन 30 लाख रूपयांची तत्कालीन गुंतवणूक समाजाने केली आहे. याच जागेवर भारत कृषक समाजाने भरविलेल्या पहिल्या जागतिक कृषी प्रदर्शनाचे स्मारक म्हणून " पटियाला" या गावी अमरावतीच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेशी संलग्न श्री शिवाजी कॉलेज सुरू केले आहे. जुलै 1961 मध्ये महाराष्ट्रात जळगांव ला 'कृषीभवन' ही फार मोठी या समाजाची वास्तु बांधण्यात आली आहे व जळगांव वरून या समाजाचे 'कृषक समाचार ' हे एक नियतकालिक निघते.

### *समाजाच्या सदस्यत्वाची पध्दत –*

भारत कृषक समाजाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक उपक्रम राबविले. 1998 च्या आकडेवारीवरून या समाजाचे दोन लाखापर्यंत आजीव सभासद आहेत. या समाजाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दीवर्षात 1997–98 या वर्षात नवे एक लाख परिवार सदस्य नोंदविण्याची मोहीम कार्यरत होती. त्यावेळी समाजाची आजीवन फी 110 रूपये आहे व पतीपत्नी दोघांची आजीवन फी 150 रूपये आहे (कुटूंब सदस्य ) भारत कृषक समाजाचे पहिले अधिवेशन दिल्ली येथे 3 एप्रिल 1955 : व पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली भरले. भारतातील 16 राज्यातून 450 प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित होते. हे प्रथम अधिवेशन भरविण्याचा मान दिल्ली राज्याला मिळाला. या प्रसंगी डॉ. पंजाबराव म्हणाले, 'शेतीव्यवसायाचा विकास करत असताना येणा-या समस्या एकत्र येऊन सोडविण्यासाठी भारतीय शेतकरी हळूहळू जागरूक होऊ लागला आहे. हे या पहिल्या मेळाव्याला उपस्थित असणा-या शेतक-यांच्या संख्येवरून लक्षात येते. जगाच्या तुलनेत प्रती एकरी आमचे उत्पादन फारच कमी आहे. आम्ही प्रगत पध्दतीचा अवलंब करून पिकाऊ जमिनीमध्ये खते घातल्यास एकरी उत्पादन वाढू शकेल. शेतक-यांनी शेती थोडी आधुनिक पध्दतीने केली तर नक्कीच उत्पादन वाढेल.8 थोडक्यात शेतक-यांचा उध्दार हेच हित लक्षात ठेवून या समाजाने आपले कार्य केले.

### *भारत कृषक समाजाचे महत्वपूर्ण कार्य –*

भारत कृषक समाजाने आखिल भारतीय स्वरूपाचे महत्वपूर्ण असे कार्य केले आहे.

1) कृषी हा लाभदायक उद्योग व्हावा व कृषीनिर्मित कृषी वस्तूंची किमान किंमत निश्चित केली जावी यासाठी त्यांनी शेतक-यांमध्ये हक्काची जाणीव निर्माण करून दिली.
2) शेतक-यांच्या हितसंबंधाकडे लक्ष देऊन रेल्वे व इतर दळणवळणाच्या साधनांचे दर निश्चित केले जावे याकरिता प्रयत्न केला.
3) शेतक-यांना काबीव्दारे कर्ज मिळविताना होणा-या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला.
4) कृषिविषयक शिक्षण देणा-या शाळा, महाविद्यालये, कृषिसंशोधन संस्था स्थापन करण्याकरिता सरकारला प्रोत्साहित केले.
5) भारताच्या विविध राज्यातील शेतक-यांना परदेशातील शेतक-यांच्या भेटीची संधी प्राप्त करून देऊन व्यापक प्रमाणात आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
6) सहकारी पध्दतीने शेती करण्यासाठी शेतक-यांना, सरकारला प्रोत्साहित केले.
7) कृषिविषयक चर्चासत्रे, मेळावे व प्रदर्शने भरवून शेतक-यांना संघटित केले व चर्चेच्या माध्यमातून अनेक कृषिविषयक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.
8) कृषिविषयक राष्ट्रव्यापी स्वरूपाच्या संस्था निर्माण करून शेतक-यांना त्यांचा संबंध तत्सम आंतरराष्ट्रीय संस्थाशी प्रस्थापित केला. उदा.

1) लाखोंकरिता अन्न संघटना – 1955
2) आखिल भारतीय ताडगूळ संघ – 1955
3) युवक कृषक समाज– 3 एप्रिल 1956
4) कृषिसहाय्यक यंत्रसंघटना– 8 ऑगस्ट 1957
5) राष्ट्रीय कृषी सहकारी विक्री संघ– 1 ऑक्टोबर 1958.
6) कृषक सहकारी अधिकोष– 22 नोव्हेंबर 1960.
7) आफ्रो आशियाई ग्रामीण पुनर्रचना संघटना– 31 मार्च 1968.
8) आखिल भारतीय मधमाशी पाळक संघटना
9) कृषी उत्पादकांचा आंतरराष्ट्रीय संघ 9

3

***भारत कृषक समाजाला आर्थिक पाठबळ :–***

स्थापनेनंतर सुरूवातीच्या काळात केंद्रीय कृषी मंत्रालयाने या समाजाला उदारपणे सर्वतोपरी आर्थिक व इतर मदत व आवश्यक ते सहकार्य केले. पुढील चार ते पांच वर्षात हा समाज आर्थिक पायावर सुस्थिर झाल्यानंतर केंद्रीय कृषी मंत्रालयाने मदतीचा हात क्रमशः आखडता घेतला व समाजानेही पुढे सरकार कडून अथवा इतर कोणाकडून मदतीची अपेक्षा न करता कार्य केले.

वरील कार्याबरोबरच भारत कृषक समाजाने शेतक–यांच्या उपयोगी अनेक नवनवीन योजना भारतात प्रथमच हाती घेतल्या.

1) उत्पादक उपभोक्ता सहकारी संघ.
2) बियाणे, कृमीनाशक औषधे, पेट्रोल, तेल आदीचा पुरवठा करणा–या कृषक संस्था.
3) कृषी अवजारे, पशूंकरीता चारा व इतर आनुषंगिक साहित्य यांची गरज भागविण्याकरिता कृषकाकरिता चालविल्या जाणा–या उद्योग प्रतिष्ठानांची स्थापना.
4) प्रमुख पिकांच्या विकासासाठी पीक–समस्यांची स्थापना.
5) कापूस, ज्युट, तंबाखू, लोकर, चामडी, मसाले इ. पदार्थांची विक्री, प्रतवारी, व संस्करण याबाबत शेतक–यांना मदत व्हावी म्हणून विशाल प्रमाणावर सहकारी समित्यांची स्थापना केली.
6) कृषी वार्षिकांक, नियतकालिक, पत्रिका व आवश्यक प्रसिध्दीपत्रके यांचे प्रकाशन केले.
7) कृषकांच्या जीवन विम्याचे कार्य केले.
8) दिल्लीजवळ 'मितरी' या ठिकाणी कृषी महाविद्यालय, दिल्लीच्या आसपास कृषी अनुसंधान (कृषी संशोधन ) शाळा व दिल्लीमध्ये कृषी संग्राहलय यांची स्थापना इ. अनेक महत्वपूर्ण योजना भारत कृषक समाजाने कार्यान्वित केल्या.

भारत कृषकसमाजाच्या वरील महत्वपूर्ण कार्याबरोबरच भारतीय शेतक–यांची प्रातिनिधिक संघटना म्हणून भारत कृषक समाजाला–

'' इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ''
'' इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल एज्युकेशन ''
'' अन्न व विकास योजना आयोग ''
'' इंडियन स्टँडर्ड इन्स्टिटयूट ''
'' ऑल इंडिया रेडिओ '' इ. संस्थावरील प्रतिनिधित्व लाभले आहे.

अशारितीने स्वातंत्र्योत्तर भारतात पहिल्या दशकात कृषकांच्या विकासासाठी स्थापन झालेली 'भारत कृषक समाज'' या संघटनेने स्थापनेपासून 10 वर्षाच्या काळात शेतक–यामध्ये प्रचंड जागृती निर्माण करून त्यांच्या कल्याणाकरिता पुरक अशा उपयुक्त संस्था निर्माण केल्या व त्यांना सहकार्याने, प्रोत्साहनाने व आर्थिक सहकार्याने कार्यक्षम बनविले व राजकारणापासून अलिप्त राहण्याच्या धोरणामुळे भारत कृषक समाजास देशातील विविध पक्षातील विचारवंताचेही सहकार्य लाभले आहे.

***जागतिक कृषी प्रदर्शन –***

भारत कृषक समाजाचे सर्वात महत्वपूर्ण कार्य म्हणजे 11 डिसेंबर ते 14 फेब्रुवारी 1959–60 या कालावधीत दिल्ली येथे भरविलेले भव्य असे जागतिक कृषी प्रदर्शन. असे प्रदर्शन यापूर्वी कोठेही भरविण्यात आले नव्हते व त्यानंतरच्या काळात अजूनपर्यंत झाले नाही. दिल्लीमध्ये 100 एकर जागेत 50 लाख रूपये खर्च आलेल्या प्रदर्शनात भारताबरोबर अमेरिका, रशिया, चीन, पोलंड, फ्रान्स,, ब्रिटन, कोरिया, इराण, इराक, सिलोन, मंगोलिया, अफगाणिस्तान, व्हिएतनाम, ब्रम्हदेश, झेकोस्लोव्हाकिया, जर्मनी इ. राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी मोठमोठाले मंडप लावून कृषी व अन्न उद्योगाच्या विकासाचे टप्पे दाखविणारी भव्य रचना केली होती. भारतातील तत्कालीन शेतक–यांना हे प्रदर्शन म्हणजे अपूर्व अशी संधीच होती.12 कृषी क्षेत्रात झालेले जागतीक पातळीवरील बदल, संशोधन, प्रगती भारतीय शेतक–यांना या प्रदर्शनात पहावयास मिळाली.

### *समारोप :–*

स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिल्या दशकात स्थापन झालेला हा समाज म्हणजे शेतक–यांच्या जीवनाला नवसंजीवनी देणारी घटना होय. ही संस्था देशव्यापी असून आजही तिचे कार्य चालूच आहे. या समाजाने भारतातील शेतकरी आंदोलनाला नवी दिशा, आशा, भाषा दिली. भारतीय शेतकरी म्हणजे सर्वात मोठा अन्नदाता आणि राष्ट्राचा पोशिंदा व त्याचे दारिद्रय आणि अज्ञान दूर करणे म्हणजे भारताला वैभवाला नेणे. शेतक–यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाचा ध्यास ठेवूनच त्या समाजाने कार्य केले. प्रगतीची व वैभवाची दिशा समाजाने भारतातील सर्व जाती, धर्म, पंथ व भाषेच्या शेतक–यांना देण्याचे कार्य केले. नवविज्ञानाच्या मार्गाने आपला व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे देशात नवीन विचार नवीन जागृती निर्माण झाली.

भारता सारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या लाखो खेडयातील शेतकरी संघटित होऊन जागृत झाला आहे व या संघटनेची देशव्यापी आंदोलने दरवर्षी होऊ लागली आहेत. संघटनेमार्फत शेतकरी संघटीत होऊन एकमुखाने बोलू लागला आहे. भारत कृषक समाजाचे मौलिक असेच कार्य आहे.13 कृषी विकासाला फार मोठी चालना देण्याचे काम या समाजाने केले आहे.

### *संदर्भ :–*

1) (संपादक ) पडोळे आ.पा. विविध दर्शन मोहोड, नागपूरे, कदम के.बी. 27 डिसेंबर 1964 प्. 65
2) देशमुख कल्पना – डॉ. पंजाबराव देशमुखांचे सामाजीक योगदान ऋचा प्रकाशन नागपूर 1997 पृ. 27
3) सावरकर सुदाम – डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य सुर्यकर रा.ब. 27 डिसेंबर 1964 पृ. 86
4) Bharat Krishak Samaj New Delhi Bharat Krishak Samaj Constitution P 1
5) भारत कृषक समाज स्मरणिका 1992– 27 वे राष्ट्रीय अधिवेशन नागपूर
6) सावरकर सुदाम – डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य पृ. 91
7) उपरोक्त – पृ. 89
8) खादय और कृषी मंत्रालय, भारत सरकार– केंद्रीय कृषी मंत्री के परिपत्रकोंका सारांश पृ. 1960 पृष्ठ 78, पृष्ठ 78
9) प्राचार्य पवार ना.ग. – महामानव डॉ. पंजाबराव देशमुख भारती प्रकाशन पुणे 1993 पृ. 17 ते 19
10) सावरकर सुदाम – पृ. 90, 91
11) गोळे दौलतराव – भारतीय कृषक क्रांतीचे जनक कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी प्रकाशन अमरावती 27 / 12 / 1996 पृ. 9–10
12) कृषकवाणी – उत्तरप्रदेश कृषक समाचार प्रमुख पत्र लखनऊ जानेवारी 1960
13) दीक्षीत पी. के. कृषक समाचार जुलै 1958 नवी दिल्ली पृष्ठ 2



***कल्पना राजीव मोहिते.***
M.A. M.Phil. Ph.D.P.G.D.C. , यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय , इस्लामपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org